**फिर्यादीचा पुढील सरतपास वकील श्री. नभेश ठाकूर यांचेमार्फत शपथेवर सुरु :**

१७. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. निशाणी क्र. ४/१ सोबत मी आरोपीने दिलेला धनादेश दाखल केलेला आहे. त्यावर आरोपी अमोल भोईर याची सही आहे. तो चेक त्याने मला दिला होता. त्यास **निशाणी क्र. १७** देण्यात येते. आरोपीने दिलेला चेक मी आर.डी.सी.सी. बॅकेत वटण्याकरीता भरला होता. सदरचा धनादेश बॅलन्स नसल्यामुळे परत आला. त्याचा मेमो मला बॅकेने दिलेला आहे. त्यावर बॅकेचा सही शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. १८** देण्यात येते. चेक न वटल्याबाबत मी आरोपीला नोटीस पाठविल्याची पावती दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. १९** देण्यात येते.

१८. आरोपीला नोटीस मिळाल्याबाबत पोचपावती मी दाखल केलेली आहे. त्यास **निशाणी क्र. २०** देण्यात येते. आरोपीला पाठवलेल्या नोटीसची स्थळप्रत मी दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. २१** देण्यात येते. सदर नोटीसला आरोपीने उत्तर दिले होते. ते मी दाखल केलेले आहे. त्यास **निशाणी क्र. २२** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. सचिन मकाणी यांचेमार्फत** :

१९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्याकडे प्रत्यक्ष हातऊसने पैसे मागितले नव्हते. आरोपीने पैसे कधी मागितले होते ती तारीख माझ्या लक्षात नाही. मी आरोपीला दि. १२/१२/२०२२ रोजी माझ्या पत्नीच्या खात्यातून १,००,०००/— रुपये एन्.एफ्.टी.मार्फत पाठविले होते. मी आरोपीकडून पैसे दिल्याबाबत लेखी लिहून घेतले नव्हते.

:: ::

२०. मी दुसऱ्या वेळेला आरोपीला दि. ०८/०१/२०२३ रोजी पैसे दिले होते. आरोपीने त्यावेळेस माझ्याकडून १,५०,०००/– रुपये घेतले होते. आरोपीला १,५०,०००/– रुपये दिल्याबाबत मी त्याच्याकडून लिहून घेतले नव्हते. मी आरोपीला १,५०,०००/– रुपये रोख दिले होते. मी इनकम टॅक्स भरत नाही, तेवढे माझे उत्पन्न नाही.

२१. आरोपीने पुन्हा दि. ०१/०२/२०२३ रोजी पुन्हा पैसे मागितले होते. मी आरोपीला पुन्हा २,००,०००/– रुपये दिले होते. मी आरोपीला २,००,०००/– रुपये दिल्याबाबत लेखी लिहून घेतलेले नाही. मी आरोपीला १,५०,०००/– रुपये व २,००,०००/– रुपये माझ्या खात्यातून काढून दिले नव्हते. माझे पैसे परत मिळाले नाहीत म्हणून मी आरोपीला नोटीस पाठविली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ४,५०,०००/– रुपये दिल्याबाबत आरोपीकडून हमीपत्र लिहून घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने पैसे देणे टाळाटाळ केली असल्याबाबत मी त्याला नोटीस पाठविली नव्हती.

२२. पैसे दिल्यानंतर आरोपी पुन्हा मला भेटला नाही. दि. २४/०८/२०२३ रोजी आरोपीने मला चेक दिला होता. आरोपीने ४,५०,०००/– रुपये देण्यापोटी हा चेक दिल्यासंदर्भात मला सांगितले नव्हते. हे मला माहीत नाही की, आरोपीला इंग्रजी लिहीता येत नाही. मला हे सांगता येणार नाही की, चेकमधील मजकूर हा वेगळ्या शाईतील आहे व सही वेगळ्या शाईतील आहे.

२३. चेक परत केल्याचा मेमो मला दि. २५/०८/२०२३ रोजी मिळाला होता. मी चेक वटण्यासाठी आर.डी.सी.सी. बॅक, शाखा रेवदंडा येथे भरला होता. मेमो मी हेड ऑफीसकडून घेतला होता. दि. ०६/०९/२०२३ रोजी मी आरोपीला वकीलांमार्फत नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने नोटीसला

उत्तर दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला ज्यावेळी पहिल्यांदा १,००,०००/— रुपये दिले होते त्यावेळेस आरोपीने सुरक्षितता म्हणून चेक दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी कोऱ्या चेकचा गैरउपयोग करुन खोटी केस दाखल केलेली आहे.

२४. मी आरोपीने पाठविलेले नोटीसचे उत्तर वाचलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ४,५०,०००/— रुपये दिले नव्हते. आरोपीला नोटीस कधी मिळाली होती ती तारीख माझ्या लक्षात नाही. आरोपीची सही मी चेकवरुन ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी केस दाखल केलेली आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०३/०७/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

**निशाणी क्र. २८ कडील अर्जावरील आदेशावरुन उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. सचिन मकाणी यांचेमार्फत :**

२५. माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. १ मध्ये नमूद असलेला खाते क्रमांक १२३०१०११०००३१०९ माझ्या पत्नीचा नाही. साक्षीदार सांगतो की, तो खाते क्रमांक आरोपीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. १ मध्ये मी चुकून खाते क्रमांक नमूद केलेला आहे. निशाणी क्र. २१ कडील नोटीसमध्ये पत्नीचा खाते क्रमांक १२३०१०११०००३१०९ मी चुकीचा लिहीलेला आहे. मी नोटीस वाचून त्यावर सही केली होती.

२६. हे म्हणणे खरे आहे की, नोटीस निशाणी क्र. २१ मध्ये पान क्र. ३ वर परिच्छेद क्र. ७ मध्ये धनादेश रायगड सेंट्रल को.ऑप. बॅक लि. पनवेल, शाखा पनवेलमध्ये जमा केल्याचे नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला चेक रिटर्न मेमो हे पनवेल शाखा यांनी दिलेला आहे. मी नोटीसमध्ये आर.डी.सी.सी. बॅक हेड ऑफीस, अलिबाग यांनी चेक रिटर्न मेमो दिल्याबाबत लिहीलेले नाही. मी फिर्यादीमध्ये आर.डी.सी.सी. बॅक हेड ऑफीस, अलिबाग यांनी चेक रिटर्न मेमो दिल्याबाबत लिहीलेले आहे. साक्षीदारास फिर्याद व सरतपास दाखवण्यात आला. ते पाहून साक्षीदार सांगतो की, आर.डी.सी.सी. बॅक हेड ऑफीस, अलिबाग चेक रिटर्न मेमो दिल्याबाबत मी लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, चेक बॅकेत जमा केल्याबाबत मी काऊंटर स्लीप दाखल केलेली नाही. पनवेल बॅकेने मला मेमो दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आर.डी.सी.सी. बॅक हेड ऑफीस, अलिबाग येथे काम करत असल्यामुळे मी त्यांच्याकडून दबाव टाकून मेमो घेतलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी हेड ऑफीसला चेक जमा केला नव्हता. मी चेक हेड ऑफीसला

:: ::

जमा केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी नोटीसमध्ये, फिर्यादीमध्ये व पुराव्यामध्ये हेड ऑफीसमध्ये चेक जमा केल्याचे नमूद केलेले नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०५/१२/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.